असा. क्र. ११०                    रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**शनिवार, मे २९, २००४/ ज्येष्ठ ८, शके १९२६**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

# भाग चार-ब

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## ग्रामविकास व जलसंधारण विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २९ मे २००४

**अधिसूचना**

**मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८.**

क्रमांक व्हीपीएम. २६०१/प्र.क्र. १४६५/पंरा-४(२२).––मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (१९५९ चा मुंबई तीन) याच्या कलम १२४, पोट-कलम (१) या खंड (नऊ) व कलम १७६, पोट-कलम (२) चा खंड (सव्वीस) अन्वये, महाराष्ट्र शासनास प्रदान करण्यात आलेल्या व त्याबाबतीत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे, महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे. हे नियम उक्त कलम १७६ चे पोट-कलम (४) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे यापूर्वी प्रसिद्ध करण्यात आले होते :––

१. **संक्षिप्त नाव.**––या नियमांना महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व शुल्क (सुधारणा) नियम, २००४ असे संबोधण्यात येईल.



Scanned by CamScanner

२. हे नियम, भाग वीस (पंचायत क्षेत्रात येणाऱ्या क्षेत्रांना भेट देणाऱ्या अभ्यागतांवरील प्रतिव्यक्ती कर) याच्या तरतुदींशी संबंधित असलेले हे नियम केवळ रायगड जिल्ह्याच्या उरण तालुक्यातील घारापुरी ग्रामपंचायतीच्या अधिकारितेत येणाऱ्या घारापुरी बेटाच्या क्षेत्राला व राज्य शासन राजपत्रात अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करू शकेल अशा तऱ्हेच्या कोणत्याही क्षेत्राला लागू असतील.

३. हे नियम दिनांक १ जून २००४ पासून लागू होतील.

४. महाराष्ट्र ग्रामपंचायत कर आणि शुल्क नियम, १९६० मधील भाग एकोणीस नंतर खालील भाग समाविष्ट करण्यात येईल, तो असा :—

## भाग वीस

## पंचायत क्षेत्रात येणाऱ्या क्षेत्राना भेट देणाऱ्या अभ्यागतांवरील प्रतिव्यक्ती कर

१४४. **व्याख्या.**—या भागात संदर्भानुसार किंवा विषयानुसार काहीही प्रतिकूल नसेल तर,—

(क) " सोई सुविधा " याचा अर्थ, मार्ग, रस्ते, मोकळ्या जागा, उद्याने, मनोरंजन व खेळाची मैदाने, क्रीडा संकुले, कवायतीची मैदाने, बगीचे, बाजार, वाहने उभी करण्यासाठीची मोकळी जागा, प्राथमिक व माध्यमिक शाळा आणि महाविद्यालये, चिकित्सालये, दवाखाने व रुग्णालये, पाणीपुरवठा व वीजपुरवठा, रस्त्यावरील दिवे, मलनिःसारण, जलनिःसारण, सार्वजनिक बांधकामे व इतर सोयी, सेवा आणि सुविधांचा यात समावेश असेल ;

(ख) " समिती " याचा अर्थ, राज्य शासनाने या भागाच्या प्रयोजनार्थ, घटित केलेली समन्वय समिती, असा आहे ;

(ग) " कायम रहिवासी " याचा अर्थ, पंचायतीच्या हद्दीच्या आत जिच्या मालकीचे घर आहे किंवा सर्वसाधारणपणे जी वास्तव्य करून राहात आहे अशी व्यक्ती, असा आहे ;

(घ) " कर " याचा अर्थ, या भागाअन्वये पंचायतीच्या हद्दीतील अभ्यागताच्या प्रवेशावर आकारण्यात येणारा प्रतिव्यक्ती कर, असा आहे ;

(ङ) " तात्पुरता रहिवासी " याचा अर्थ, पंचायतीच्या हद्दीत ज्याने तात्पुरत्या रहिवासासाठी प्रवेश केला आहे असा अभ्यागत, असा आहे ;

(च) " अभ्यागत " याचा अर्थ, पंचायतीच्या हद्दीतील कायम रहिवासी सोडून तात्पुरत्या रहिवासासाठी त्यात प्रवेश करणारी कोणतीही व्यक्ती, असा आहे.

१४५. **प्रतिव्यक्ती कर, त्याचे प्रदान व प्रक्रिया.**—(१) राज्य शासनाने कोणत्याही पंचायतीच्या क्षेत्रात प्रतिव्यक्ती कर घेण्यास मंजुरी दिली असेल व अशा पंचायत क्षेत्राच्या हद्दीत कोणत्याही अभ्यागताने प्रवेश केला तर, तो या भागाला जोडलेल्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या, किमान दरापेक्षा कमी नसेल व कमाल दरापेक्षा अधिक नसेल अशा दराने प्रतिव्यक्ती कर भरेल.

(२) कर वसूल करण्यातून खालील व्यक्तींना सूट देण्यात येईल, त्या पुढीलप्रमाणे :—

(क) अशा ग्रामपंचायतींचा कायम रहिवासी

(ख) कामावरील शासकीय कर्मचारी, आणि

(ग) ५ वर्षांखालील मुले.

Scanned by CamScanner

(३) जर एखाद्या मुलाच्या वयाबाबत किंवा एखादी व्यक्ती पंचायतीची कायम रहिवासी आहे किंवा नाही याबाबत, किंवा तिला पोट-नियम (२) च्या तरतुदीतून सूट देण्यात आली आहे किंवा नाही याबाबत कोणताही प्रश्न उपस्थित झाल्यास, असे प्रकरण संबंधित पंचायतीच्या सरपंचाकडे निर्णयार्थ सोपविण्यात येईल.

(४) या भागास जोडलेल्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे अशा पंचायतींना ठरविलेल्या दराने कर भरल्याशिवाय कोणत्याही अभ्यागतास पंचायतीच्या हद्दीत प्रवेश करता येणार नाही. पंचायतीने या प्रयोजनार्थ, ठरविलेल्या एका किंवा अनेक ठिकाणी पंचायतीने नियुक्त केलेल्या व्यक्तीने किंवा व्यक्तींनी मागणी केल्यावर अभ्यागत प्रतिव्यक्ती कराची रक्कम भरेल.

(५) प्रतिव्यक्ती कर भरल्यानंतर, प्रत्येक अभ्यागतास पास देण्यात येईल. असा पास हस्तांतरणीय नसेल. पंचायत पासाचा आकार, नमुना व रंग ठरवील आणि असे पास छापून घेईल.

(६) पोट-नियम (१) च्या तरतुदींचा भंग करणारा कोणताही अभ्यागत सिद्धपराधी ठरल्यावर, त्याला रुपये १०० पर्यंतच्या दंडाची शिक्षा होईल.

१४६. **प्रतिव्यक्ती कराचा हिशोब.**—(१) पंचायत प्रतिव्यक्ती करापासून मिळालेल्या उत्पन्नाची सर्व रक्कम, अधिनियमाच्या कलम ५७ खाली निर्माण केलेल्या ग्राम निधीत जमा करील.

(२) पंचायत प्रतिव्यक्ती करापासून प्राप्त होणाऱ्या उत्पन्नातील जमा व त्यातून केलेला खर्च दर्शविणारा हिशेब स्वतंत्रपणे ठेवील. ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक प्रतिव्यक्ती कराचा हिशेब संबंधित गटविकास अधिकाऱ्याला लेखा परीक्षेसाठी सादर करील.

(३) अधिनियमाच्या तरतुदींनुसार, पंचायतीच्या कायम रहिवाशांना फायदा व्हावा या हेतूने सोईसुविधांची तरतूद करण्यासाठी, पंचायत अशा प्रतिव्यक्ती कराच्या वार्षिक प्राप्तीच्या २५ टक्के इतकी रक्कम त्यासाठी प्रत्यक्ष उपयोगात आणील. वार्षिक प्राप्तीच्या उर्वरित ७५ टक्के रक्कम समितीचे सुचनेनुसार क्षेत्राच्या विकासासाठी आणि अभ्यागतांना मूलभूत सुविधा पुरविण्यासाठी उपयोगात आणली जाईल.

१४७. **समन्वय समिती घटित करणे.**—राज्य शासनाद्वारे समन्वय समिती घटित करण्यात येईल. समन्वय समितीत खालील सदस्यांचा समावेश असेल, ते असे :—

| | | |
|---|---|---|
| (एक) | सचिव, ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय .. | अध्यक्ष |
| (दोन) | उप सचिव, ग्रामविकास विभाग (पंचायत राज), महाराष्ट्र शासन .. | सदस्य |
| (तीन) | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे प्रतिनिधी .. | सदस्य |
| (चार) | महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे प्रतिनिधी .. | सदस्य |
| (पाच) | वन विभागाचे प्रतिनिधी .. | सदस्य |
| (सहा) | भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाचे प्रतिनिधी .. | सदस्य |
| (सात) | संबंधित जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी .. | सदस्य |
| (आठ) | संबंधित जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी .. | सदस्य |
| (नऊ) | संबंधित ग्रामपंचायतीचे सरपंच .. | सदस्य |
| (दहा) | संबंधित जिल्हा परिषदेचे (ग्रामपंचायत) उप मुख्य कार्यकारी अधिकारी | सचिव |

Scanned by CamScanner

(२) शासन वेळोवेळी समन्वय समितीची पुनर्रचना करील.

(३) समन्वय समितीचे सदस्य सचिव समितीचे अध्यक्ष ठरवतील अशा वेळी, ठिकाणी व दिवशी वेळोवेळी समितीची बैठक बोलावतील. प्रत्येक वर्षात प्रत्येक तीन महिन्यांच्या कालांतराने समितीच्या किमान चार बैठकी घेण्यात येतील.

## अनुसूची

(पहा नियम १४५)

| अनुक्रमांक (१) | वर्गवारी (२) | प्रतिव्यक्ती किमान दर (३) | प्रतिव्यक्ती कमाल दर (४) |
|---|---|---|---|
| | | रुपये | रुपये |
| १ | प्रौढ व्यक्ती (१२ वर्षांवरील वयाची) | ५ | ५ |
| २ | मुले (वय ६ ते १२ वर्ष) | ३ | ३ |
| ३ | शाळेच्या सहलीतील विद्यार्थी (शाळेच्या सहल प्रमुखाने सदर विद्यार्थी शाळेतील आहेत असे प्रमाणपत्र दिले पाहिजे.) | १ | १ |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

कुंदा गोसावी,
शासनाच्या उप सचिव.

Scanned by CamScanner

# RURAL DEVELOPMENT AND WATER CONSERVATION DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 29th May 2004

*NOTIFICATION*

BOMBAY VILLAGE PANCHAYATS ACT, 1958.

No. VPM. 2601/CR-1465/PR-4 (22).—In exercise of the powers conferred by clause (*ix*) of sub-section (*1*) of section 124 and clause (*xxvi*) of sub-section (2) of section 176 of the Bombay Village Panchayats Act, 1958 (Bom. III of 1959), and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby make the following rules further to amend the Maharashtra Village Panchayats Taxes and Fees Rules, 1960, the same having been previously published as required by sub-section (*4*) of the said section 176, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Village Panchayats Taxes and Fees (Amendment) Rules, 2004.

2. These rules regarding the provisions of Part XX (CAPITATION TAX ON VISITORS VISITING PLACES SITUATED WITHIN THE AREA OF PANCHAYAT) shall be applicable exclusively to the Gharapuri Island area situated within the jurisdiction of Gharapuri Village *Panchayat*, in Uran Taluka of Raigad District, and to any such area which the State Government may, by notification in the *Official Gazette*, specify.

3. These rules shall come into force from 1st June 2004.

4. In the Maharashtra Village Panchayats Taxes and Fees Rules, 1960, after PART-XIX the following Part shall be inserted, namely :—

## PART XX

## CAPITATION TAX ON VISITORS VISITING PLACES SITUATED WITHIN THE AREA OF PANCHAYAT

144. *Definitions.*—In this Part, unless there be anything repugnant in the subject or context,—

(*a*) " amenities " means roads, streets, open spaces, parks, recreation grounds, playgrounds, sport complex, parade grounds, gardens, markets, parking lots, primary and secondary schools and colleges, clinics, dispensaries and hospitals, water supply, electricity supply, street lighting, sewerage, drainage, public works and includes other utilities, services and conveniences ;

Scanned by CamScanner

(*b*) " Committee " means the Co-ordination Committee constituted by the State Government for the purposes of this Part ;

(*c*) " Permanent resident " means a person who owns a house or who ordinarily stays within the limits of the *panchayat* ;

(*d*) " Tax " means the capitation tax levied on the entry of visitors in the *panchayat* limits under this Part ;

(*e*) " Temporary resident " means a visitor who has entered within the limits of the *panchayat* for temporary stay ;

(*f*) " Visitor " means any person other than a permanent resident entering into the limits of the *panchayat* for temporary stay.

145. *Capitation tax, its payment and procedure,—(1)* If in the area of any *panchayat* where taking of a capitation tax is sanctioned by the State Government, any visitor enters in the limits of the area of such *panchayat,* he shall pay capitation tax at the rate, but not below the minimum and not exceeding the maximum rates, specified in the schedule annexed to this Part.

*(2)* The following persons shall be exempted from the payment of the capitation tax, namely :—

*(a)* Permanent residents of such Village *panchayat.*

*(b)* Government servants on duty, and

*(c)* Children below 5 years.

*(3)* If any question arises regarding the age of the child or whether a person is, or not a permanent resident of *panchayat* area or is exempted from the provisions of sub-rule (2), the matter shall be referred for decision to the *Sarpanch* of the concerned *panchayat*.

*(4)* No visitor who is liable to pay the capitation tax shall enter within the limits of the *panchayat* without paying a tax at the rates decided by such *panchayat* as specified in the schedule annexed to this Part. Visitors shall pay amount of capitation tax on demand made by the person or persons appointed by the *panchayat* at such place or places as may be fixed by the *panchayat* for the purpose.

*(5)* On payment of the capitation tax, a pass shall be issued to each visitor. Such pass shall be not transferable. The *panchayat* shall determine the size, form and colour of the passes and shall get the same printed.

Scanned by CamScanner

*(6)* Any visitor who commits the breach of the provisions of sub-rule (1) shall on conviction, be punished with fine upto rupees one hundred.

146. *Capitation Tax Account.—(1)* The *panchayat* shall credit all the proceeds of the capitation tax to the Village Fund created under section 57 of the Act.

*(2)* The *panchayat* shall also maintain a separate account showing the receipts and expenditure incurred from the proceeds of the capitation tax. The secretary of the *panchayat* shall submit the accounts of Capitation Tax to the concerned Block Development Officer for audit.

*(3)* The *panchayat* shall utilise twenty-five per cent. of such annual receipts of the capitation tax directly for the provision of amenities intended to benefit the permanent residents of *panchayat* as per the provisions of the Act. The balance of seventy-five per cent. of such annual receipt of the capitation tax shall be utilised in accordance with the directions of the Committee for the development of the site and for providing basic facilities to the visitors.

147. *Constitution of Co-ordination Committee.—(1)* The Co-ordination Committee shall be constituted by the State Government. The Co-ordination Committee shall consists of the following members, namely :—

(*i*) Secretary to Rural Development Department, Government of Maharashtra, Mantralaya. ... Chairman

(*ii*) Deputy Secretary (Panchayat Raj) to Rural Development Department, Government of Maharashtra, Mantralaya. ... Member

(*iii*) Representative of the Mumbai Metropolitan Region Development Authority. ... Member

(*iv*) Representative of Maharashtra Tourism Development Corporation. ... Member

(*v*) Representative of Forest Department ... Member

(*vi*) Representative of Archeological Survey of India ... Member

(*vii*) Collector of the concerned District ... Member

(*viii*) Chief Executive Officer of the concerned Zilla Parishad. ... Member

(*ix*) Sarpanch of the concerned Village Panchayat ... Member

(*x*) Deputy Chief Executive Officer (Village Panchayat) of the concerned Zilla Parishad. ... Secretary.

Scanned by CamScanner

(2) The Government shall reconstitute the Co-ordination Committee from time to time.

(3) The Member-Secretary of the Co-ordination Committee shall call the meeting of the Committee at such time, place and date as may be fixed by the Chairman of the Committee, from time to time. Atleast 4 meetings of the Committee shall be held every year each within the interval of three months.

*Schedule*

(*See* rule 145)

| Serial No. (1) | Category (2) | Minimum rate per person (3) | Maximum rate per person (4) |
|---|---|---|---|
| | | Rs. | Rs. |
| 1 | Adult (above the age of 12 years) ... | 5 | 5 |
| 2 | Child (between the age of 6 to 12 years)... | 3 | 3 |
| 3 | Student of the school trip (Incharge of the school trip should produce certificate that the students are from school). | 1 | 1 |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

KUNDA GOSAVI,
Deputy Secretary to the Government.



Scanned by CamScanner